SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणार
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ०७८ ● पुणे ● शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



राजमाता जिजाऊ महिला महासंघाचे कार्य प्रेरणादायी 3



अनधिकृत बांधकामे काढण्यासाठी सहा दिवसांची मुदत 4

## ठळक बातम्या

### २६४ केंद्रांवर २०१८ पासून गैरप्रकार

सोलापूर (आरंभ पर्व) : पुणे विभागातील तीन जिल्ह्यांमध्ये इयत्ता दहावीसाठी ६६० केंद्रे असून इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ४३२ केंद्रे आहेत. त्यातील इयत्ता दहावीच्या १३९ तर इयत्ता बारावीच्या १२५ केंद्रांवर २०१८ पासून कॉपीसारखे गैरप्रकार आढळले आहेत. अशा केंद्रांची माहिती बोर्डाने एकत्रित केली असून त्या केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल होणार हे निश्चित झाले आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी पुणे बोर्डाने मुख्यमंत्र्यांच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला होता. पण, त्याला शिक्षक, मुख्याध्यापक संघटनांसह शिक्षक आमदारांनी विरोध केला. याची दखल घेत बोर्डाने २०१८ पासून (कोरोना काळ वगळून) ज्या परीक्षा केंद्रांवर कॉपीसारखे गैरप्रकार झाले, त्याच केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार किती व कोणत्या केंद्रांवर गैरप्रकार घडले, याची माहिती संकलित केली आहे. त्यात पुणे विभागातील एकूण २६४ केंद्रे आहेत, ज्या केंद्रांवर २०१८ पासून कॉपी प्रकार झाले होते. त्यात सोलापूर जिल्ह्यातील दहावीचे ४७ तर बारावीची ३४ परीक्षा केंद्रे आहेत. दरम्यान, शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून आता त्या केंद्रांवरील पर्यवेक्षक व केंद्र संचालक अन्य शाळांमधील नेमले जाणार आहेत.

### २५ लाखांचे अमली पदार्थ जप्त

पुणे (आरंभ पर्व) पोलिसांनी मार्केट यार्ड आणि विमाननगर भागात छापेमारी करीत २५ लाख ५१ हजार रुपये किमतीचे मेफेड्रोन, गांजा अमली पदार्थ जप्त केले. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने ही कारवाई केली. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड यांच्यासह पथक शुक्रवारी (ता. ३१) गस्तीवर होते. त्यावेळी पोलिस अंमलदार चेतन गायकवाड यांना मेफेड्रोन तस्करीची माहिती मिळाली. त्यानुसार या पथकाने लोहगाव-वाघोली रस्ता परिसरातून कुमेल महम्मद तांबोळी (वय २८, रा. धानोरी) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १९ लाख १७ हजार रुपयांचे ८३ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. याबाबत विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. विमाननगर भागात मेफेड्रोन तस्करीच्या प्रकरणात किरण भाऊसाहेब तुजारे (वय २४, रा. आव्हाळवाडी, वाघोली) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून सहा लाख २७ हजार रुपयांचे ३० ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. पोलिस कर्मचारी संदीप शिर्के यांना मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. तसेच, आनंदनगर-बिबवेवाडी रस्त्यावर सैफन ऊर्फ शफीक इस्माईल शेख (वय ५२, रा. आनंदनगर) याच्याकडून सात हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. पोलिस कर्मचारी अजीम शेख यांना मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. याबाबत मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# प्रेमसंबधातुन दोघांवर कोयत्याने वार

## दोन महाविद्यालयीन विद्यार्थी जखमी, तीन विद्यार्थ्यांना अटक

**वालचंदनगर (दै. आरंभ पर्व)**

भवानीनगर (ता.इंदापूर) येथे मुलीच्या प्रेमसंबधावरुन दोन विद्यार्थ्यांच्यावर कोयत्याने वार केल्याप्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी पाच विद्यार्थ्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून, यामध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. कोयत्याने मारामारीमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी बारामती व इंदापूर तालुक्यामध्ये वेगवेगळ्या कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत. याप्रकरणी पोलिसांनी अदनान महंमद शेख (वय-१९, रा. सणसर), पियुष प्रथम चव्हाण (वय-१९, रा. सणसर), यशराज गणेश अरवडे (वय-१९, रा. सर्वजण सणसर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या मारमारीमध्ये सुजल जाधव हा विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर बारामतीमधील खासगी रुग्णालयामध्ये उपचार सुरु आहेत. तसेच संचित बाळासो घोळवे ही जखमी झाला आहे. वालचंदनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार आज शुक्रवार (ता. ३१) रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास संचित घोळवे व सुजल जाधव व त्यांचे सहकारी मित्र भवानीनगर भवानीमातेच्या मंदिरामध्ये बसले असताना अदनान शेख, पियुष चव्हाण, यशराज अरवडे व दोन अल्पवयीन मित्र असे पाच जणांनी सुजल जाधव व संचित घोळवे यांना लाथांनी मारहाण करून कोयत्याने वार केले.

### प्रेमसंबधातुन कोयत्याने वार...

**सदरचा कोयता हल्ला मुलीच्या प्रेमसंबधातुन झाला आहे. काल गुरुवारी प्रेमसंधतुन वाद झाला होता. मात्र तो विद्यार्थ्यांनी आपआपसात मिटवला असल्याचे पोलिसांनी सांगितले.**

### सिनेस्टाईल पाठलाग करुन आरोपींना पकडले...

**सदरच्या कोयत्याच्या हल्लानंतर आरोपी पुणेच्या दिशेने पळून चालले होते. वालचंदनगर पोलिसांनी तातडीने वेगवेगळी दोन पथके तयार करुन पुणेच्या दिशेने रवाना केली. आरोपींना सिनेस्टाईल पाठलाग करुन सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये स्थानिक गावकरी यांच्या मदतीने शिफातीने अटक केली.**



सदरच्या घटनेचे माहिती वालचंदनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे व पोलीस उपनिरीक्षक विजय टेळकीकर यांनी तातडीने मुलांना ताब्यात घेवून कारवाई केली.

सदरची कारवाई पुणे जिल्हाचे पोलिस अधिक्षक पंकज देशमुख,अप्पर पोलिस अधिक्षक गणेश बिरादार, बारामतीचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुर्दशन राठोड, यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे, पोलीस उप-निरीक्षक विजय टेळकीकर, पोलीस हवालदार गुलाबराव पाटील, बापु मोहिते, शैलेश स्वामी, गणेश काटकर, अजित थोरात, नानासाहेब आटोळे, सचिन गायकवाड, अभिजीत कळसकर, विक्रमसिंह जाधव यांनी केली.

## कॅब बुक केल्यावर झाला वाद! पुणे स्टेशनवर तरुणीवर स्थानिक ऑटो चालकाची अरेरावी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील सार्वजनिक वाहतुकीबाबत अनेक प्रवाशांच्या तक्रारी वाढत आहेत. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, पुणे रेल्वे स्थानकावर एका तरुणीला स्थानिक ऑटो रिक्षाचालकाने हैराण केले. तिने उबरद्वारे कॅब बुक केली असता, एका स्थानिक ऑटो चालकाने तिच्यासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, पुन्हा एकदा पुण्यातील प्रवासी सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पुणे रेल्वे स्थानकावर प्रवास करणाऱ्या एका तरुणीने सोशल मीडियावर तिचा अनुभव शेअर केला. तिने उबरद्वारे कॅब बुक केली होती आणि त्या गाडीची प्रतीक्षा करत असताना, एका स्थानिक ऑटोचालकाने तिला विचारले की, तिला कुठे जायचे आहे. तिने नम्रपणे सांगितले की, तिला ऑटोची गरज नाही.

त्यानंतर, त्या ऑटोचालकाने उबरवरील भाडे किती आहे, हे विचारले. तरुणीने उत्तर दिले की, १६० रुपये आहे. यावर तो ऑटोचालक चिडला आणि म्हणाला, "हे खूप कमी आहे, २०० रुपयांत चला माझ्यासोबत."

जेव्हा तिने स्पष्टपणे सांगितले की, तिची कॅब आधीच बुक आहे, तेव्हा तो ऑटोचालक अधिक आक्रमक झाला.

तरुणीची कॅब स्टेशनवर पोहोचताच, त्या ऑटोचालकाने कॅब ड्रायव्हरसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. त्याने विचारले की, १६० रुपयांत कुठेही नेण्याचा दर इतका कमी कसा असू शकतो? कॅब ड्रायव्हरने उत्तर दिले की, "हे ॲपचे रेट आहेत, यात तुम्ही हस्तक्षेप करू नका."

तरुणी कॅबमध्ये सामान ठेवत असताना देखील, तो ऑटोचालक त्रास देत राहिला. तो इतक्यावरच थांबला नाही, तरुणी कॅबमध्ये बसताच, त्याने काचा ठोठावत धमकी दिली – "तू खराडीत राहतेस ना? भेट तिथे, मी बघतो तुला!"

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272



# संबंधांमध्ये सुधारणांचे संकेत?

भारत आणि चीन या दोन देशांमध्ये परस्पर संबंध प्रस्थापित झाले त्याला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. तसे पाहता दोन्ही देशांदरम्यान १९६२ मधील युद्धजखमांचे व्रण कायम आहेत. पाच वर्षांपूर्वी या जखमांवरील खपली गलवान संघर्षाच्या निमित्ताने निघाली आणि जखमेबरोबर संबंधही चिघळले. परंतु दोन अजस्रा अर्थव्यवस्थांना सतत परस्परांशी युद्धाच्या छायेत राहणे परवडण्यासारखे नाही हे शहाणपण हळूहळू झिरपू लागले आहे. भारतीय परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी नुकताच बीजिंगचा दौरा केला आणि तेथील काही उच्चपदस्थांशी भेटीगाठी केल्या. चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी हे त्यांतील एक. या भेटीमध्ये अर्थातच बिगर-लष्करी संबंध सुरळीत करण्यावर चर्चा झाली. त्याअंतर्गत दोन देशांदरम्यान हवाई सेवा पूर्ववत करणे, व्हिसा तसेच इतर प्रक्रिया सुरळीत करणे आणि कैलाश-मानसरोवर यात्रेला (चीनकडून) परवानगी या मुद्द्यांवर मतैक्य झाले. हे महत्त्वाचे, कारण परस्पर विश्वास वा अविश्वास केवळ सीमेवरील हालचाली आणि धोरणांवर अवलंबून नसतो. इंग्रजीत ज्यास 'ट्रॅक-टू डिप्लोमसी' असे संबोधले जाते तो समांतर संबंधांचा मार्गही अनुसरणे आवश्यक असते. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये बीजिंगला दिलेली भेट महत्त्वाची ठरली होती. त्यानंतर जवळपास तीन दशके भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा होत गेली. सीमावर्ती वादग्रस्त टापूंच्या बाबतीतही चर्चा सुरू राहिली. परंतु गेल्या दशकाच्या सुरुवातीस अध्यक्षपदी क्षी जिनपिंग विराजमान झाल्यानंतर चीनची नियत बदलली हे स्पष्टच आहे. कोविड – १९ मुळे परस्पर दळणवळणात खंड पडला, पण गलवान घुसखोरीमुळे संबंधांमध्येच नव्याने कटुता निर्माण झाली. हे संबंध आता कुठे स्थिरस्थावर होऊ लागले



आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात देम्चोक आणि देपसांग या पूर्व लडाखमधील टापूंमध्ये गस्तीक्षेत्राबाबत मतैक्य झाल्यानंतर सैन्यमाघारीला वेग आला. सैन्यमाघारी ही गलवानपूर्व स्थितीपर्यंत झाली पाहिजे आणि त्यानंतर या संपूर्ण टापूचे निर्लष्करीकरण झाले पाहिजे अशी भारताची आग्रही मागणी आहे. निर्लष्करीकरणाच्या दिशेने अद्याप फारशी प्रगती झालेली नाही.

पण ती होत नाही तोवर इतर संबंध गोठलेले राहण्यात काहीच हशील नाही. चीनची 'भाषा' गेल्या वर्षभरात बदलली आहे हे नक्की. चिनी मालावर, विशेषत: विद्युत वाहनांवर घसघशीत आयातशुल्क आकारून युरोपने आपला वाहन उद्योग वाचवण्यासाठी पावले उचलली आहेत. युक्रेन युद्ध आणि बराच काळ रेंगाळलेली पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती यांमुळे पुरवठा शृंखला खंडित होऊन, व्यापारावर भर असलेली चिनी अर्थव्यवस्था मंदावू लागली आहे. हिमालयीन सीमेवर भारताने प्रत्युत्तर दिले तसेच प्रत्युत्तर सागरी सीमावर्ती भागांत तैवान आणि जपानच नव्हे, तर फिलिपिन्ससारखे छोटे देशही देऊ लागले आहेत. हे घडत असताना आता अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखी अत्यंत तऱ्हेवाईक व्यक्ती निवडून येणे याचीही दखल चीनला घ्यावीच लागत आहे. ज्या देशांविरुद्ध 'टॅरिफ-अस्त्र' वापरू अशी धमकी ट्रम्प वारंवार देत आहेत, त्यांत चीनचे नाव पहिल्या तीनमध्ये आहे! अशा परिस्थितीत भारताशी संबंध पूर्ववत करणे हे चीनसाठी राजकीय, आर्थिक दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

पण परिस्थितीचा फायदा उठवण्याची संधी भारतानेही दवडता कामा नये. सारे काही सुरळीत होत आहे असे वाटत असतानाच चीनकडून विश्वासघात होतो हा इतिहास फार जुना नाही. दोन्ही देशांमधील व्यापारी समीकरण भारताच्या दृष्टीने विसंगत, विपरीत आहे. चीनबरोबर आपली व्यापारी तूट आता १०० अब्ज डॉलर (अंदाजे ८६०० कोटी रुपये) इतकी प्रचंड आहे. औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, विद्युत वाहने आदी उद्योगांसाठी चिनी उत्पादने आणि उपकरणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहेत. त्यांवरील अवलंबित्व पुढे महागात पडू शकते. कारण अलीकडे काही उपकरणांवर चीनने निर्बंध लादले, त्याचा फटका येथील उद्योजकांना बसलाच. दुसरीकडे, चिनी मालाला अमेरिका आणि युरोपने अटकाव केला तर भारत हीच मोठी आणि सक्षम बाजारपेठ आहे. पण त्या आधारावर आपला 'आवाज' वाढला पाहिजे. त्यासाठी आपली उद्योग सिद्धता वाढली पाहिजे. चीन पुन्हा भारताकडे स्नेहार्द्र भावाने वळला, यात त्याचा फायदा आहेच. पण त्यातून काय मिळवणार हे आपणच सुनिश्चित केले पाहिजे.

# ४५ पदार्थ बनवणाऱ्या मल्टिस्मार्ट इलेक्ट्रिक कूकरला मिळाले पेटंट

## पुण्यातील नवउद्योजकांची क्रांती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पाच वर्षांच्या परिश्रमातून विजय मोहिते (वय ४०), प्रवीण कांबळे (वय ५०) आणि स्वाती कानडे (वय ४०) या पुण्यातील या मराठी नवउद्योजकांनी तब्बल ४५ पदार्थ बनवणाऱ्या मल्टिस्मार्ट इलेक्ट्रिक कूकरची निर्मिती केली आहे. या कूकरचे पेटंटही त्यांना मिळाले आहे, यामुळे पुणे शहराच्या लौकिकात भर पाडली असून उद्योगविश्वात एक नवा इतिहास निर्माण केला आहे. यातील पर्यावरणपूरक तंत्रज्ञानामुळे विजेची बचत आणि गॅसच्या खर्चातही कपात होणार आहे. सध्या देशभरात अशा प्रकारचा हा एकमेव कूकर असून या कूकरमध्ये तब्बल ४५ पदार्थ तयार करता येतात. सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी, वृद्ध या सर्वांनाच या कूकरचा मोठा उपयोग होईल. हा कूकर सहलीसाठी किंवा आवश्यकतेप्रमाणे कुठेही घेऊन जाऊ शकतो. याचा उपयोग आपण आपल्या सोयीनुसार करू शकतो. खास करून नोकरदारांसाठी हा कूकर एक वरदानच ठरणार आहे. कारण गॅसशिवाय झटपट जेवण तयार करता येते. महिलांच्या हातात हा मल्टिस्मार्ट कूकर आल्यामुळे मोठा बदल होईल. अनेकम स्मार्ट कूकरचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीची भाजी आपण कढईमध्ये बनवतो अगदी







तसेच अनेकम स्मार्ट कूकरमध्ये अवघ्या काही मिनिटात बनवू शकतो. इलेक्ट्रिक कूकर असल्यामुळे गॅसची गरज नाही. यामध्ये नाश्त्याचे पदार्थ, सूप, स्टार्टर्स, स्नॅक्स, भात, ग्रेव्ही, नूडल्स, पास्ता आणि नॉन-व्हेज अशा एक हजारांहून अधिक रेसिपीज ज्या तुम्ही या झटपट इलेक्ट्रिक कुकरच्या भांड्यात बनवू शकता. या मल्टिस्मार्ट कूकरला लवकरच देशात नाही तर जगभर मागणी वाढणार असल्याचे मत अनेक उद्योगातील मान्यवरांनी व्यक्त केले. फक्त नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा व्यवसायात ही फार मोठी संधी आहे. हे केवळ एक घरगुती उपकरण नसून नवउद्योजकांना, तसेच वितरकांना यातून मोठी व्यावसायिक संधी उपलब्ध होईल.

जागतिक दर्जाची सुरक्षितता

हे इलेक्ट्रॉनिक उपकरण (इंडिया) च्या चाचणी आणि प्रमाणीकरणासाठी सर्वात विश्वासार्ह Apex बॉडीकडून "BIS सेफ्टी स्टँडर्ड" द्वारे प्रमाणित करण्यात आले आहे. तसेच इतर कोणत्याही प्रेशर कुकर ब्रँडच्या तुलनेत सर्वात सुरक्षित प्रेशर रिलीझ यंत्रणेसह डिझाइन केलेले आहे.

# थोडक्यात



## देशभरातील कलाकारांच्या कलाकृतींचे 'सप्तरंगी कला प्रदर्शन' सुरू

**पुणे (आरंभ पर्व) : देशभरातील 40 हून अधिक कलाकारांच्या कलाकृती असलेल्या 'सप्तरंगी' कला प्रदर्शनाला आज (शुक्रवार) पासून सुरुवात झाली आहे. कला, भारतीय संस्कृती आणि पर्यावरणाला समर्पित हिसारच्या टैलेंटिला फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आर्ट गॅलरी येथे या कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून हे प्रदर्शन 2 फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार आहे. सप्तरंगी कला प्रदर्शनाचे उद्घाटन सहभागी महिला कलाकारांच्या हस्ते करण्यात आले. या कला प्रदर्शनात देश-विदेशातील प्रसिद्ध कलाकार हरिप्रिया नरसिंहान, सोनल सक्सेना, मोनिता ढींगरा, केदारनाथ भागवत, राखी कुमारी, दत्तात्रय खेळकर, सुधीर करणडे, अर्चना श्रीवास्तव, रचना सिंह, हेरिबेर्टो नोपनी, नरेंद्र गंगाखेडकर, सतीश पोटदार, धात्री थानकी, कारमेला न्यूनेज, संजय उमरानीकर, निहारिका श्रीवास्तव, जयश्री पाटील, क्रेजेंटा कदम, आर्या कुलकर्णी, माधुरी गयावाल, विनय जोशी, हीरालाल गोहिली, प्रीती राऊत, विभावरी देसाई, इशिता रामाप्रसाद, अंजन रॉय, सोलेदाद बुरगालेता, भाग्यश्री गोडबोले, डॉ बाय एस कुलकर्णी, दत्तात्रेय खेडकर आदींसह 40 कलाकारांच्या चित्रांचा समावेश आहे. टैलेंटिला फाउंडेशनच्या संस्थापक आणि संचालक अनुराधा खरे आणि विनीत खरे यांनी सांगितले की, आमच्या संस्थेचे पुण्यातील हे दुसरे कला प्रदर्शन आहे. या कला प्रदर्शनात विविध प्रकारच्या कलांचे प्रदर्शन करण्यात आले आहे, तसेच देशातील प्रसिद्ध कलाकार संजय उमरानीकर, मोनिता ढींगरा, विभावरी देसाई, केदारनाथ भागवत लाईव्ह आर्ट डेमो देणार आहेत. सहभागी सर्व कलाकारांचा सन्मान समारोप प्रसंगी केला जाणार आहे. 'सप्तरंगी' हे प्रदर्शन 2 फेब्रुवारी पर्यंत दुपारी 12 ते रात्री 8 पर्यंत सुरू राहणार असून मोफत प्रवेश आहे.**

# 'ग्लोबल आडगाव' चित्रपटाला चार नामांकने जाहीर

- **ग्लोबल आडगाव चित्रपटाचा राज्य शासनाच्या पुरस्कारांच्या नामांकनामध्ये चौकार**
- **निर्माते मनोज कदम यांच्या ग्लोबल आडगाव' चित्रपटाचा राज्य शासनाच्या पुरस्कारांच्या नामांकनामध्ये दबदबा**





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रसिद्ध उद्योजक व सर्जशील चित्रपट निर्माते म्हणून सुपरिचित असलेले मनोज कदम यांनी निर्मिती केलेल्या ग्लोबल आडगाव चित्रपटाला महाराष्ट्र राज्य शासनाच्या सन २०२२ च्या ६० व्या चित्रपट पुरस्कारासाठीच्या नामांकनांची सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी घोषणा केली. मराठवाड्याच्या मातीतील निर्मिती असलेला बहुचर्चित 'ग्लोबल आडगाव' या चित्रपटात चार नामांकने मिळाली आहेत. विशेष म्हणजे, 'ग्लोबल आडगाव' चित्रपटाला एकूण चार नामांकने मिळाल्याने चित्रपटसृष्टीच्या इतिहासात मराठवाड्याला पहिल्यांदाच मोठा बहुमान मिळाला आहे.

यावेळी निर्माते मनोज कदम बोलताना म्हणाले की ग्लोबल आडगाव' या सिनेमांमधून शेती, माती, ग्रामसंस्कृती त्याचबरोबर ग्लोबलायझेशनच्या विळख्यात अडकलेला शेतकरी, ग्लोबलायझेशन मुळे शेतीचे झालेले नुकसान अशा महत्त्वाच्या विषयावर या सिनेमाच्या माध्यमातून भाष्य करण्यात आलेले आहे.

अशी आहेत नामांकने: सर्वोत्कृष्ट चित्रपट (ग्लोबल आडगाव), सर्वोत्कृष्ट कथा - अनिलकुमार साळवे, उत्कृष्ट गीते, प्रशांत मडपूवार, उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता रोनक लांडगे अशा चार विभागात ग्लोबल आडगाव चित्रपटास नामांकने मिळाली आहेत.

यापूर्वी ग्लोबल आडगाव या मनोज कदम निर्मित, अमृत मराठे सहनिर्मित आणि अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित मराठी चित्रपटास अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत.

या चित्रपटात सयाजी शिंदे, उषा नाडकर्णी, उपेंद्र लिमये, अनिल नगरकर, रौनक लांडगे, सिद्धी काळे, अशोक कानगुडे अशा अनेक कलाकारांनी काम केले आहे. ग्लोबल आडगाव हा बहुचर्चित चित्रपट लवकरच महाराष्ट्रासह देशात व प्रदेशात लवकरच प्रदर्शित केला जाईल अशी माहिती पत्रकाद्वारे सिल्वरओक फिल्म्स अँड एंटरटेनमेंटचे मनोज कदम यांनी दिली.

# "थांब थांब कासारा" गीत रसिकांच्या भेटीला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रसिध्द गायिका चंद्रकला दासरी या गेल्या चार दशकांपासून गायनाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या गोड आवाजातून रसिकांना मंत्रमुग्ध करत आहेत. त्यांनी गायलेल्या "थांब थांब कासारा" या आगरी – कोळी गीताची सध्या सोशल मिडीयावर प्रचंड चर्चा आहे. दासरी यांनी "थांब थांब कासारा... माझ्या बाया का रुसल्यान रं.." हे गीत तीन दशकापूर्वी गायिले होते. टिप्स कंपनीने बनवले हे गीत पुन्हा नव्याने संगीतकार अनील वैती यांनी बनवले आहे. हे गीत रसिकांना भावू लागले आहे. सदरील गीत ट्रेन्डींगमध्ये आले असून ह्या गीताच्या लाखो रील्स बनल्या असून ते मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्या म्हणाल्या की माझे वडील भजनसम्राट वासुदेव सुतार यांच्याकडून मी गायकी शिकले. लहानपनापासूनच मी वडिलांसोबत भजनांच्या कार्यक्रमांना जात होते. त्यांच्याकडूनच मला गायनाचे बाळकडू मिळाले. वडिलांच्या काळात माझी गायनाची कला बहरली आणि माझे पती सुप्रसिद्ध संगीतकार आणि गायक बजरंग बादशाहा यांच्या काळात ती गायनाची कला फुलू लागली. उत्तरा केळकर, वैशाली सामंत, सुलोचना चव्हाण, श्रीकांत नारायण अशा दिग्गज पार्श्वगायकांसोबत मी पार्श्वगायन केले आहे. आगरी – कोळ्यांची लता मंगेशकर असे लोक मला बोलतात. त्याच समाधान आहे. कारण गानकोकिळा लता मंगेशकर माझ्या आदर्श आहेत. सध्या सोशल मिडिया आणि रील्सच्या जमान्यात "थांब थांब कासारा" हे मी गायलेले गीत नव्या पिढीच्या तरुणाईला आवडू लागले असून त्यांनी या गीताला पसंती दाखवली याचे मला समाधान आहे.

# वस्तीतील महिलांना 'अन्नपूर्णा परिवारा'ने दिले सुरक्षित भविष्य

## नितीन गायकवाड

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**

अन्नपूर्णा परिवाराने आपल्या सभासदांसाठी 'आधारपूर्णा' पेन्शन योजना आणली आहे, ज्यात दरमहा नियमित ठराविक रक्कम भरण्यामुळे वयाच्या ६५ वर्षांनंतर दरमहा ठराविक परतावा मिळणार आहे. 'अन्नपूर्णा परिवार' पुणे तसेच मुंबई येथील वस्तीत राहणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी ३२ वर्षांपासून कार्यरत आहे. गरीब महिला आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक सहकार्य करून स्वावलंबी करणे, त्यांना आर्थिक, आरोग्यविषयक आणि सर्वांगीण विकासासाठी सहाय्य करणे हे अन्नपूर्णा परिवाराचे उद्दिष्ट आहे.

यावेळी 'अन्नपूर्णा' च्या वार्षिक अहवालाचेही प्रकाशन करण्यात आले. कार्यकारी अधिकारी आरती शिंदे यांनी आर्थिक अहवाल सादर केला. डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ. धीरज कदम लिखित, अनुवादक सुकुमार दामले यांनी भाषांतरित केलेल्या आणि अन्नपूर्णा परिवारातर्फे (प्रकाशित 'पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ इंडिया २०१४-२४ फ्युचर डायरेक्शन') या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. परिवाराने गेल्या वर्षभरात दिलेली कर्जे, महिलांनी केलेली परतफेड, आरोग्य विम्याचा लाभ घेतलेल्या महिला, शिष्यवृत्तीचे लाभधारक याबद्दल माहिती दिली.

श्रीमती सायली निंबाळकर यांचा स्वतःचा मेसचा व्यवसाय आहे. त्या म्हणाल्या, 'मला माझ्या कुटुंबाने आणि अन्नपूर्णा परिवाराने माझा व्यवसाय वाढवण्यासाठी खूप मदत केली, अन्नपूर्णामुळे माझी उत्तरोत्तर प्रगती झाली.' 'अन्नपूर्णा परिवार' हा पुणे व मुंबई येथील वस्ती पातळीवर राहणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणासाठी ३२ वर्षांपासून कार्यरत असलेल्या ६ संस्थांचा समूह आहे. गरीब महिलांचे व त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक सेवा देऊन सबलीकरण करणे व त्यांना आर्थिक, आरोग्यविषयक व सर्वांगीण विकासासाठी सहाय्य करणे हे अन्नपूर्णा परिवाराचे उद्दिष्ट आहे. अन्नपूर्णा परिवारने सुमारे १८० कोटींची



लघु कर्जे २०२३-२०२४ च्या आर्थिक वर्षात गरीब महिलांना दिलेली आहेत व ७९ कोटी रू. ची बचत गोळा केलेली आहे. ही कर्जे कोणत्याही तारणाशिवाय किंवा जामिनाशिवाय दिली जातात. तरीदेखील या कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण १००% आहे.

अन्नपूर्णा परिवाराच्या आरोग्यविमा विभागातर्फे २०२३-२०२४ च्या आर्थिक वर्षात रू.५ कोटींपेक्षाही जास्त रक्कम गरीब महिला व त्यांच्या कुटुंबांना आजारपण व मृत्यूच्या प्रसंगी दिली गेली. अन्नपूर्णा परिवारातर्फे विद्यापूर्णा शैक्षणिक शिष्यवृत्ती दरवर्षी दिली जाते. एकल मातांच्या शिकणाऱ्या ९०० मुला-मुलींना २०२३-२०२४ च्या आर्थिक वर्षात रू. २८ लाखांचे शैक्षणिक सहाय्य दिले गेले.

एकूण १.२५ लाख कष्टकरी महिला व त्यांची कुटुंबे अन्नपूर्णा परिवाराचे सदस्य आहेत. या कार्यक्रमात अन्नपूर्णाच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा पुरव-सामंत यांनी सांगितले की या वर्षी अन्नपूर्णातर्फे त्यांच्या सभासदांना पेन्शन देण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या वृद्धापकाळात कोणावरही अवलंबून राहावे लागणार नाही.

अन्नपूर्णाद्वारे यापूर्वीपासूनच सभासदांना कर्जाचे वितरण 'कॅशलेस' पद्धतीने केले जाते आहे, ज्यात रू. ५५,००० ते रू. १० लाखांपर्यंतची कर्जे कोणत्याही तारणाशिवाय दिली जात आहेत. आधारपूर्णा पेन्शन योजनेचे आता ३५,००० सभासद झालेले आहेत, आणखी सभासदांचा योजनेत समावेश करण्याचे नियोजन आहे.

या कार्यक्रमात बऱ्याच महिला उद्योजिकांचा सत्कार करण्यात आला. त्या सर्वच महिला उद्योजकांना त्यांचे व्यवसाय आणखी वाढवायचे आहेत. श्रीमती सायली निंबाळकर यांचा स्वतःचा मेसचा व्यवसाय आहे. त्या म्हणाल्या, 'मला माझ्या कुटुंबाने आणि अन्नपूर्णा परिवारने माझा व्यवसाय वाढवण्यासाठी खूप मदत केली, अन्नपूर्णामुळे माझी उत्तरोत्तर प्रगती झाली.'

अन्नपूर्णा परिवाराच्या सभासदांपैकी काही महिलांना सर्वोत्तम उद्योजक पुरस्कार, आदर्श माता, सकारात्मक सामाजिक बदल ह्यासाठी पुरस्कार आणि सर्वोत्तम गट पुरस्कार विश्वस्त डॉ. मेधा पुरव -सामंत, श्रीमती वृषाली मगदूम, श्रीमती रोहिणी देशपांडे, श्रीमती अंजली पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

अन्नपूर्णा परिवाराचा सुवास्तू टॉवर या प्रसंगी महिलांना अर्पण करण्यात आला. अन्नपूर्णा परिवारातर्फे 'पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ इंडिया २०१४-२४ फ्युचर डायरेक्शन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ह्या पुस्तकाचे लेखक डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ. धीरज कदम आणि भाषांतर कॉ. सुकुमार दामले यांनी केले आहे.

श्रीमती उज्ज्वला वाघोले यांनी सभेमध्ये विश्वस्त मंडळाची ओळख करून दिली व सभासदांकडून मान्यता घेतली. अन्नपूर्णाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. आर्थिक अहवाल कार्यकारी अधिकारी श्रीमती आरती शिंदे यांनी सादर केला.

अन्नपूर्णाचे विश्वस्त प्रा. वृषाली मगदूम यांनी सध्याच्या सामाजिक परिस्थितीबाबत सभासदांना मार्गदर्शन केले. श्रीमती अंजली पाटील यांनी आभारप्रदर्शन केले. श्रीमती सिध्दी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी "मणिपूर ते बदलापूर व्हाया कोलकाता" अशी एक चित्रफित दाखवण्यात आली. ही अलका पावनगडकर यांनी सादर केली. कार्यक्रमाची सुरूवात अन्नपूर्णाच्या पाळणाघरातील मुलांच्या गाण्याने झाली. सर्व सभासदांनी एकतेची शपथ घेऊन सर्वांनी एकत्रितपणे गायलेल्या राष्ट्रगीताने या कार्यक्रमाचा शेवट झाला.

### या सभेत घेण्यात आलेले काही महत्त्वाचे निर्णय

१. **सभासदांना १०% डिविडंड देण्याची घोषणा करण्यात आली.**
२. **जास्तीत जास्त सभासदांनी आधारपूर्णात नाव नोंदणी करून म्हातारपणी आर्थिक सुरक्षिततेचे फायदे मिळावावेत यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.**
३. **सभासदांनी अन्नपूर्णा परिवारकडून घरासाठी गृह कर्ज घेऊन गटागटांनी आपली घरे सुंदर बांधण्याचा निश्चय केला.**

## थोडक्यात



### देविंदर, प्रियांकाकडे कर्णधारपद

पुणे (आरंभ पर्व) : उत्तराखंडमध्ये होणाऱ्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी हॉकी महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघांचे कर्णधारपद अनुक्रमे आंतरराष्ट्रीय देविंदर वाल्मिकी आणि प्रियांका वानखेडे हिच्याकडे सोपविण्यात आले आहे. दोन्ही संघांच्या उपकर्णधारपदी अनुक्रमे अनिकेत गुरव आणि भावना खाडे यांची निवड करण्यात आली आहे. हॉकी महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि आयपीएस (एडीजी फोर्स वन, महाराष्ट्र पोलीस) कृष्ण प्रकाश यांनी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर येथे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज भोरे यांच्या उपस्थितीत 18 सदस्यीय संघांची घोषणा केली आणि दोन्ही संघांना शुभेच्छा दिल्या. हॉकी स्पर्धा 4 ते 14 फेब्रुवारी 2025 या कालावधीत होतील. महाराष्ट्र पुरुष संघाचा ब गटात समावेश असून सलामीची लढत 5 फेब्रुवारीला तामिळनाडू विरुद्ध सुरुवात होईल, त्यानंतर उत्तर प्रदेश (6 फेब्रुवारी), उत्तराखंड (8 फेब्रुवारी) आणि हरियाणाविरुद्ध (10 फेब्रुवारी) सामने होतील. महिलांचा ब गटात समावेश असून सलामीचा सामना यजमान उत्तराखंडविरुद्ध (5 फेब्रुवारी) होईल. त्यानंतर महाराष्ट्र संघ झारखंड (7 फेब्रुवारी), मिझोराम (9 फेब्रुवारी) आणि मणिपूर (10 फेब्रुवारी) संघाशी दोन हात करेल.

### ग्लोब टेक्सटाइलच्या राइट्स इश्यूला 14.69% सबस्क्रिप्शन मिळाले

Globe Textiles ( India ) Ltd. Superior Quality

अहमदाबाद (आरंभ पर्व) : कपडे, कॉटन प्रिंटेड फॅब्रिक्स, होम टेक्सटाइल्स आणि फॅन्सी फॅब्रिक्सच्या उत्पादनात गुंतलेली ग्लोब टेक्सटाइल्स (इंडिया) लिमिटेड (NSE-GLOBE) च्या 4504 लाख रुपयांचा राइट्स इश्यूला पहिल्या दिवशी 14.69% सबस्क्रिप्शन मिळाले. कंपनीचा राइट्स इश्यू 24 जानेवारीला सबस्क्रिप्शनसाठी उघडला आणि 6 फेब्रुवारीला बंद होईल. हा इश्यू 24 जानेवारी रोजी राईट्स इश्यूच्या बंद भावाच्या तुलनेत प्रति शेअर 3 रुपयाच्या परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहे. Globe Textiles चे शेअर्स नसलेले गुंतवणूकदार देखील Globe Textiles (NSE चिन्ह: GLOBE-RE1) चे हक्क खरेदी करून राइट्स इश्यूमध्ये सहभागी होऊ शकतात. शुक्रवारी, GLOBE-RE1 च्या 67.85 लाख हक्कांची एन्टाइटलमेंट एक्सचेंजवर खरेदी-विक्री झाली. GLOBE-RE1 0.61 रुपये वर उघडले. 0.72 रुपये उच्च, आणि 0.55 रुपयाच्या नीचांकाला स्पर्श केला व 0.58 वर बंद झाला. ऑन-मार्केट हक्क सोडण्याची अंतिम मुदत 31 जानेवारी आहे.

### ऑनलाइन वीजबिल भरा; स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच जिंका!

पुणे (आरंभ पर्व) : सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांपासून वीजबिल ऑनलाइन पद्धतीने भरणाऱ्या लघुदाब वीजग्राहकांसाठी महावितरणकडून जानेवारी ते मे महिन्याच्या कालावधीसाठी 'लकी डिजिटल ग्राहक योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत प्रत्येक उपविभाग स्तरावर पाच बक्षिसे देण्यात येणार असून, एकूण तीन लकी ड्रॉ काढण्यात येणार आहेत. यात विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच असे बक्षीस देण्यात येणार आहे. पुणे प्रादेशिक विभागातील १५९ उपविभागांसाठी एकूण २ हजार ३८५ बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. ही योजना विद्यमान कर्मचाऱ्यांसाठी लागू नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. ज्या लघुदाब वीजग्राहकांनी सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांपासून वीजबिलांचा ऑनलाइन पद्धतीने भरणा केला आहे, तसेच दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत एकदाही वीजबिल किंवा त्याचा ऑनलाइन भरणा केलेला नाही अशा ग्राहकांसाठी ही योजना आहे.







# राजमाता जिजाऊ महिला महासंघाचे कार्य प्रेरणादायी

## रूपालीताई चाकणकर : राजमाता जिजाऊ महिला महासंघाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न!

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

महिलांसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविणारा राजमाता जिजाऊ महिला महासंघ एक प्रेरणादायी आहे. असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ .रूपालीताई चाकणकर यांनी व्यक्त केले.

आपल्या सामाजिक उपक्रमाने प्रसिद्ध असलेल्या राष्ट्रसेवा समूहाची महिला संघटना असलेल्या राजमाता जिजाऊ महिला महासंघाचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले..

त्यावेळी सौ रूपालीताई चाकणकर या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले व राष्ट्रसेवा समूह, राजमाता जिजाऊ महिला महासंघाकौतुक व्यक्त केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महिलांना आवश्यक किती सहकार्य नक्कीच केले जाईल अशी हमीही सौ. चाकणकर यांनी यावेळी बोलताना दिली.

धायरी गाव व परिसरातील सुहासिनी, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत, वृद्ध, निराधार, महिला बचत गट, व धायरी भागातील सर्व माता-भगिनींसाठी महिला स्नेह संमेलन कार्यक्रम आयोजन करण्यात आला..

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजिका तथा राजमाता जिजाऊ महिला महासंघ अध्यक्षा स्मिताताई राहुल पोकळे यांनी उपस्थित सर्व पाहुणे व महिलांचे स्वागत केले. राजमाता जिजाऊ महिला महासंघातर्फे घेण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती त्यांनी दिली.

यावेळी राष्ट्रसेवा समूह संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश मुख्य समन्वयक व प्रवक्ते राहुल भाऊ पोकळे यांनी उपस्थित महिलांना गेली पंधरा वर्षे राजमाता जिजाऊ महिला महासंघाच्या कामाचा लेखाजोखा महिलांसमोर मांडला. आगामी काळातही महिला भगिनींसाठी विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ रायकर यांनी केले. सदर कार्यक्रमास सुनिता डांगे सायली टिळेकर माजी सरपंच राणीताई रायकर,माजी ग्रामपंचायत सदस्या कल्पना बेनकर, मा .ग्रामपंचायत सदस्य जयश्री कामठे राजमाता जिजाऊ महिला महासंघ सर्व सदस्य महिला व धायरी भागातील सर्व मान्यवर आजी माजी सदस्य आणि ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जिद्द, चिकाटी असेल तर यश नक्की - रामदास माने



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

आयुष्यात अनंत अडचणी येतात परंतु तुमच्याकडे जिद्द, चिकाटी, संयम, निर्णय घेण्याची क्षमता, प्रसंगावधान, श्रमावर निष्ठा, कृतज्ञता भाव, उत्तम संभाषण कौशल्य, विवेक हे सर्व गुण सोबत असतील तर कोणत्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक, थर्माकोल मॅन रामदास माने यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'कसा घडतो उद्योजक' या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

माने बोलताना पुढे म्हणाले की, सरकारी नोकऱ्या राहिल्या नाहीत. त्यामुळे नोकऱ्या मागणारे नको तर नोकऱ्या देणारे व्हा. विद्यार्थ्यांनी नवकल्पना राबवाव्यात. सुविधा, भांडवल, जागा नाही यांचा बाऊ करू नये. सकारात्मकपणे लढत राहणे आवश्यक आहे.

व्यवसाय, उद्योग ह्या क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर क्षमता सिद्ध करावी लागते. धोका पत्करावा लागेल. यश मिळाले तरी डोके शांत ठेवलेच पाहिजे. अपशय पदरी आले तरी निराशेला बळी पडायचे नाकारले पाहिजे. पुन्हा प्रयत्न केला पाहिले. प्रगतीचा मार्ग हा असाच असतो. यशापर्यंत पोहोचायला हा एकच राजमार्ग आहे, असे ते म्हणाले.

हे महाविद्यालय उद्योगपतींची शाळा व्हावी. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक उद्योजक व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रामदास माने यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून रोजगार हमीचा मजूर ते यशस्वी उद्योजक हा प्रवास खुमासदार शैलीत उलगडून दाखवला.

सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले. तर आभार सोनाली वाटेकरी या विद्यार्थीनीने मानले.




## खेळाडूंना प्रोत्साहन देणे गरजेचे : अजित घुले

### शेवटच्या षटकाकडे खिळल्या हजारो प्रेक्षकांच्या नजरा

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे गरजेचे असुन त्यातून अनेक उदयोन्मुख खेळाडू तयार होतील असे प्रतिपादन शासननियुक्त नगरसेवक अजित घुले यांनी केले .स्टार इलेव्हन यांनी आयोजित केलेल्या भव्य टेनिस बॉल नाईट क्रिकेट स्पर्धेच्या विजेत्यांना अजित घुले यांच्या उपस्थितत बक्षिसे देण्यात आले .

यावेळी आयोजक सुरज भापकर, मयूर शिंदे, राजेश एठेकर, राहुल परभणे, निखिल बडेकर, अभिजित जाधव यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. ही स्पर्धा चार दिवस चालली. यामध्ये चौकार व षटकारांची अतिषबाजी पाहायला मिळाली. फायनल मध्ये डब्लू सी सी वेअरहाऊस व यंग फाईटर यांच्या मध्ये यांचा सामना झाला. त्यात डब्लू सी सी संघ विजयी झाला. यंग फायटर संघाने प्रथम बॅटींग घेत ८ ओहर मध्ये ८० धावा केल्या. त्या धावांचा पाठलाग करताना डब्लू सी सी संघाची दमछाक झाली. शेवटच्या दोन धावासाठी डब्लू सी सी संघाच्या पाच विकेट गेल्या .त्यात यंग फाईटर संघाचा बोलर अनिकेत भोसले यांने ५ विकेट घेऊन डब्लू सी सी संघाला घाम फोडला .तर डब्लू सी सी संघासाठी प्रेम टेमगिरे याने पन्नास धावा करत विजय जवळ आणुन ठेवला. परंतु नंतरच्या बॅटस् मनने यंग फायटरला विकेट बहाल करत हाता तोडांशी आलेला सामना गमावतात की काय असे वाटत होते .शेवटच्या षटकात अनिकेत भोसले यांने एक विकेट घेतल्यानंतर एक धाव, एक विकेट व दोन बॉल शिल्लक असताना हजारो प्रेक्षकांच्या नजरा बॉलर व बॅट्समन वर खिळल्या .त्यात एक बॉल राखून डब्लू सी सी संघाने विजय मिळवला

या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक अजित घुले, व्दितीय पारितोषिक अशोक डोके व घनश्याम जगताप यांनी दिले .बेस्ट बॉलर आदित्य पांडेकर, मॅन ऑफ सिरीज साहिल मोडक, बेस्ट बॅटस् मन स्वप्नील तुपे, यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिसे दिली. सचिन सुंबे, सतिश जवळकर, विजय बोराटे, अमोल राऊत, रोहन खांदवे, हंसराज पाटील, राजकुमार पाटील, योगेश चव्हाण, मंथन बारवकर, महावीर जाधव, हेंमत काळभोर, ऋषीकेश जाधव, वैभव गुरव, मंगेश सकट, प्रितम पवळ, प्रतिक खळदकर, सिध्दांत आवटे, आकाश आवटे यांनी विशेष सहकार्य केले .या सामान्यासाठी आशुतोष घुले यांचे विशेष सहकार्य लाभले .

मॅन ऑफ द सिरीज धीरज संभाळे, मॅन ऑफ द मॅच प्रेम टेम गिरे, बेस्ट बॉलर सुनील चव्हाण, बेस्ट बॅट्समन धीरज संभाळे यांना वैयक्तिक बक्षीस मिळाले.

# देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्कील इंडिया डिजिटल हबच्या मराठी आवृत्तीचे अनावरण

**पुणे, महाराष्ट्र (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रात सर्वसमावेशक आणि सक्षम कौशल्य विकास प्रणालीला चालना देण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी विश्व मराठी संमेलन २०२५च्या निमित्ताने 'स्किल इंडिया डिजिटल हब' (SIDH) या प्लॅटफॉर्मच्या मराठी आवृत्तीचे उद्‌घाटन केले. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज येथे हा सोहळा शुक्रवारी पार पडला.



मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे आणि श्री. अजित पवार यांच्या उपस्थितीत एसआयडीएचच्या मराठी आवृत्तीचे लोकार्पण करण्यात आले. यामुळे व्यावसायिक, विद्यार्थी आणि संशोधकांना महत्त्वपूर्ण माहिती अधिक प्रभावीपणे वापरता येईल. तसेच, संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक ज्ञानप्रसार सुनिश्चित होईल.

या उपक्रमाच्या माध्यमातून भाषेचे अडथळे दूर करून नागरिकांना त्यांच्या मातृभाषेत आवश्यक माहिती सहज उपलब्ध करून देण्यास चालना देण्यात आली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या दृष्टिकोनाशी हे पाऊल सुसंगत आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे युवकांना 7000 हून अधिक कौशल्य विकास अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळेल. यात इंडस्ट्री 4.0, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि ड्रोन टेक्नॉलॉजी यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश आहे.

या सोहळ्याला महाराष्ट्राचे मराठी भाषा मंत्री श्री. उदय सामंत, खासदार श्री. श्रीरंग बारणे, महाराष्ट्र विधान परिषद सदस्य सौ. नीलम गोऱ्हे, आमदार श्री. सिद्धार्थ शिरोळे आणि आमदार श्री. बापूसाहेब पठारे तसेच एनएसडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि एनएसडीसी इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. वेदमणी तिवारी उपस्थित होते. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरही या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

एनएसडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वेदमणी तिवारी यांना सन्माननीय मंत्री श्री. उदय सामंत यांच्या हस्ते गौरविण्यात आले. एसआयडीएच हा ज्ञान सुलभतेसाठी एक अग्रणी उपक्रम म्हणून विकसित करण्यामध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. श्री. तिवारी यांनी नवकल्पनांना गती देत शिक्षण आणि तंत्रज्ञानाची सांगड घातली असून, देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात कौशल्य विकास पोहोचावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे एसआयडीएच भाषिक सर्वसमावेशकता आणि सशक्तीकरणासाठी एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

या समारंभात बोलताना आणि कौशल्य विकास तसेच डिजिटल सशक्तीकरणासाठी केंद्र सरकारची बांधिलकी पुनरुज्जीवित करताना श्री. तिवारी म्हणाले, "एसआयडीएचने गेल्या वर्षभरात राष्ट्रीय स्तरावर 1.26 कोटीहून अधिक रजिस्ट्रेशन्स नोंदविली आहेत. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून हजारो कौशल्य विकास अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मराठी आवृत्तीच्या लोकार्पणासह, एनएसडीसीतर्फे लाखो मराठी भाषिक युवकांना सक्षम करण्याची आणि करिअरच्या संधी उलगडण्यासाठी मदत करण्यासाठीची उपयुक्तता दर्शविण्यात आली आहे."

रजिस्ट्रेशन्सचा विचार करता महाराष्ट्र देशातील आघाडीच्या पाच राज्यांपैकी एक आहे, तर वापरकर्त्यांच्या संख्येनुसार 30% वापरकर्ते महाराष्ट्रातील आहेत. म्हणजे महाराष्ट्र उत्तर प्रदेशच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर आहे. मराठी आवृत्तीच्या लोकार्पणानंतर या प्लॅटफॉर्मवरील कौशल्य विकास अभ्यासक्रमांची लोकप्रियता आणि नोंदणी आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. हा प्लॅटफॉर्म 23 भाषांमध्ये उपलब्ध असून, मराठी त्यापैकी एक आहे.राज्यात वेब डिझाइन, सायबरसुरक्षा आणि किसान ड्रोन ऑपरेटर हे सर्वाधिक लोकप्रिय अभ्यासक्रम आहेत. विविध ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी 43,000हून अधिक महिलांनी नोंदणी केली असून, त्यापैकी 80 टक्क्यांहून अधिक महिला 30 वर्षांखालील आहेत. महाराष्ट्रातून सर्वाधिक नोंदणी आयटी-आयटीईएस, उद्योजकता आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांमध्ये झाली आहे.

माणसे आपल्या मातृभाषेत अधिक प्रभावीपणे शिकतात, त्यामुळे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय आणि एनएसडीसी यांनी स्थानिक भाषांमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत, जेणेकरून त्याचा अधिकाधिक लाभ मिळू शकेल.

"भाषा हा विकासासाठी अडथळा ठरू नये हे एसआयडीएचच्या मराठी आवृत्तीच्या लोकार्पणाद्वारे आम्ही हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करत आहोत. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020च्या दृष्टीकोनाशी हे पाऊल सुसंगत आहे. यामध्ये शिक्षण आणि कौशल्य विकासात प्रादेशिक भाषेच्या महत्त्वावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील युवक आणि जगभरातील मराठी समुदायाला भारताच्या रोजगार आणि डिजिटल कौशल्य विकास प्रणालीमध्ये सहज समाविष्ट करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत," असे श्री. तिवारी म्हणाले. त्यांनी प्रादेशिक सर्वसमावेशकता आणि डिजिटल परिवर्तनाच्या महत्त्वावरही प्रकाश टाकला.

एसआयडीएच हा एक सर्वसमावेशक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. कौशल्य विकासाच्या संधी, करिअर मार्गदर्शन आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील रोजगाराच्या संधींसाठी हा प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे. महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. त्यामुळे येथे कुशल मनुष्यबळाची मागणीही सर्वाधिक राहील.

राज्याला 2028 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभागाने (एसईईआयडी) 2023 मध्ये जिल्हानिहाय कौशल्य तफावत विश्लेषण अहवाल तयार केला.

या सर्वेक्षणात राज्यभरातील 1500 हून अधिक उद्योग आणि 2 लाखांहून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. पारंपरिक आणि नव्या युगातील क्षेत्रांमधील कौशल्य तफावत समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले. यात इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोटिव्ह, कृषी, बीएफएसआय आणि आयटी/आयटीईएस या क्षेत्रांमध्ये तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले.

2023मध्ये करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात कामगार वर्गाची भाषा प्रवीणता देखील तपासण्यात आली. यात बहुतेक कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेवर प्रभूत्व आवश्यक असण्यावर भर दिला. उद्योग क्षेत्रातील 95 टक्के प्रतिसादकर्त्यांनी कामगारांना मराठी भाषा येणे आवश्यक असल्याचे नमूद केले, तर 83 टक्के प्रतिसादकर्त्यांनी हिंदी भाषा आवश्यक असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र हे उद्योग आणि व्यापाराचे केंद्र असल्याने, या उपक्रमामुळे युवकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध होतील आणि त्यांना सक्षमपणे रोजगाराच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होता येईल.

उद्‌घाटन सोहळ्यात प्लॅटफॉर्मच्या प्रमुख वैशिष्ट्यांचा व्हिडिओ सादर करण्यात आला. यात त्याची सहज वापरता येणारी यंत्रणा आणि युवकांना 50,000हून अधिक उद्योग भागीदार तसेच 5.5 लाख आंतरवासिता संधींशी उपलब्ध करून देण्याची क्षमता दाखवण्यात आली. एसआयडीएचची मराठी आवृत्ती आकांक्षा आणि संधी यांना जोडणारा दुवा ठरेल आणि भारताला जागतिक कौशल्य केंद्र करण्याच्या दिशेने पुढे नेईल. या शिवाय, या प्लॅटफॉर्मवर इंडस्ट्री-स्पेसिफिक कौशल्य मॉड्यूल, प्रमाणपत्र कार्यक्रम आणि एम्प्लॉयर म्हणजे नियोक्त्यांनी तयार केलेले रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध असतील, जेणेकरून युवक रोजगारसज्ज होतील.



# अनधिकृत बांधकामे काढण्यासाठी सहा दिवसांची मुदत

- **महापालिका, पोलीस प्रशासन आणि व्यावसायिकांच्या बैठकीत निर्णय**

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

चिखली, कुदळवाडीतील व्यावसायिकांच्या वाढत्या विरोधानंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढून घेण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली आहे. सात फेब्रुवारीपासून पुन्हा कारवाईला सुरुवात केली जाईल, असा पवित्रा महापालिकेने घेतला आहे. दुसरीकडे ही कारवाई होऊ नये, यासाठी व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदाम तसेच, हॉटेल, बेकरी, पत्राशेड, वर्कशॉप अशा अनधिकृत असलेल्या पाच हजार अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा दिल्या होत्या. १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर अनधिकृत गोदामे, पत्राशेड, बांधकामे हटवण्यासाठी गुरुवारी (३० जानेवारी) महापालिकेचे पथक गेले होते. मात्र, या कारवाईविरोधात व्यावसायिक रस्त्यावर उतरले. त्यामुळे कारवाई न करताच महापालिकेचे पथक माघारी परतले. शुक्रवारी (३१ जानेवारी) कारवाई होऊ नये, यासाठी सुमारे चार हजारपेक्षा जास्त व्यावसायिकांनी एकत्र येऊन कुदळवाडीत रस्त्यावरच बैठक घेतली. पोलिसांनी व्यावसायिकांची समजूत घालून महापालिकेत बैठकीसाठी प्रतिनिधींनी यावे, अशी विनंती केली.

त्यानंतर महापालिकेत शहर अभियंता मकरंद निकम, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर, 'क' क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे आणि व्यावसायिकांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली. या बैठकीतही व्यावसायिकांनी तूर्त अतिक्रमण कारवाई करू नये, आम्हाला सहा महिन्यांची मुदत द्यावी, अशी मागणी केली. मात्र, महापालिका अधिकारी यांनी सहा दिवस कारवाईला स्थगिती दिली. सात फेब्रुवारीपासून अतिक्रमणांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट सांगितले.

**अतिक्रमण कारवाईविरोधात व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकांवर १४ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. असे असतानाच ३० जानेवारी रोजी व्यावसायिकांनी ४८ याचिका दाखल केल्या आहेत. व्यावसायिकांबरोबर बैठक झाली. अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली आहे. मुदत संपल्यानंतर सात फेब्रुवारीपासून कारवाई सुरू केली जाईल. सद्यस्थितीत आरक्षित जागेच्या अतिक्रमणांवरील कारवाई सुरूच राहणार असल्याचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.**

# हिप शस्त्रक्रियेमध्ये परिवर्तन घडवून आणणारे एक तंत्र - डॉ. आशिष अरबत

## रुग्णांच्या विभिन्न गरजांसाठी एक तंत्र



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुपरपाथ (सुप्राकॅप्सुलर पर्क्यूटेनियसली असिस्टेड टोटल हिप) हिप रिप्लेसमेंट सर्जरी ही सांधे बदलण्याच्या तंत्रांमध्ये एक महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवते, जी कुल्ल्यांचा दुखावा आणि हालचालीं मध्ये अडचण येणाऱ्या व्यक्तींसाठी कमीत कमी छेदांसह शस्त्रक्रियेचा पर्याय देते. ही पद्धत स्नायू आणि मऊ ऊती टिकविण्यावर भर देतो, ज्यामुळे रुग्ण विनासायास बरे होऊ शकतो आणि शस्त्रक्रियेनंतरचे परिणाम सुधारतात. भारतात, जिथे वयस्कांची वाढती लोकसंख्या, बैठी जीवनशैली आणि संधिवात आणि एव्हस्कुलर नेक्रोसिस (एव्हीएन) सारख्या परिस्थितींमुळे कुल्ल्याच्या समस्या वाढत आहेत, तिथे हालचाल क्षमता पुनः साध्य करण्यासाठी आणि वेदना कमी करण्यासाठी सुपरपाथला एक मौल्यवान पर्याय म्हणून ओळखले जात आहे. ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेतील तज्ञ डॉ. आशिष अरबत म्हणाले की सुपरपॅथ तंत्र हिप रिप्लेसमेंटमध्ये बदल घडवून आणते. त्याचा कमीत कमी आक्रमक दृष्टीकोन स्नायू आणि मऊ ऊतींचे रक्षण करते, ज्यामुळे लवकर बरे होतात, वेदना कमी होतात आणि हालचाल सुधारते. पीडित रुग्णांसाठी. एव्हीएन आणि संधिवात यांसारख्या हिप स्थितींपासून, सुपरपॅथ एक गेम चेंजर आहे स्वातंत्र्य आणि जीवनाची गुणवत्ता पुनर्संचयित करणे. राहुल, पुण्यातील एक ३९ वर्षीय मर्चंट नेव्ही ऑफिसर आहे. त्याला दोन वर्षांपर्यंत बायलॅटरल एव्हीएन चा त्रास होत होता, ज्यामुळे त्याला मदतीशिवाय चालणे, उभे राहणे किंवा बसणे देखील अशक्य झाले होते. या दुखण्यामुळे त्याला शेवटी नोकरी सोडावी लागली. त्याच्या उजव्या कुल्ल्यासाठी सुपरपाथ प्रक्रिया करण्यात आली आणि दोन दिवसांनीच त्याला डिस्चार्ज देण्यात आला. स्नायूंना इजा न पोहोचविण्याच्या तंत्रामुळे तो प्रभावीपणे बरा झाला आणि तो आता सामान्य कार्यभार परत सुरू करण्याच्या मार्गावर आहे. भारतात सुपरपाथ तंत्राबद्दल जागरूकता वाढत असताना, जलद बरे होणे, कमी वेदना आणि हालचालीची सुधारित क्षमता शोधणाऱ्या रुग्णांसाठी ते एक मौल्यवान उपाय प्रदान करत आहे. आरोग्याच्या वैयक्तिक स्थितीनुसार परिणाम बदलू शकतात, परंतु हे तंत्र कमजोर हिप असलेल्यांसाठी एक आशादायक पर्याय असल्याचे सिद्ध होत आहे.

# प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकाची 'हप्तेखोरी'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वानवडी पोलीस ठाण्यात नियुक्तीस असलेल्या प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकाने बेकायदा हुक्का पार्लर चालविणाऱ्या एका हॉटेलचालकाकडून कारवाई न करण्यासाठी दरमहा २० हजार रुपये हप्त्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक विशाल पवार याला पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले आहेत. शहरातील बेकायदा धंद्यांवर कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. कोंढव्यातील एका हॉटेलमध्ये हुक्का पार्लर सुरू होते. त्यावर पोलिसांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी छापा टाकला होता. हॉटेलमालकाचा मोबाइल तपासला असता वानवडी पोलीस ठाण्यातील प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक विशाल पवारचा मोबाइल क्रमांक आढळून आला. दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. पवार याला १ डिसेंबर रोजी वानवडी पोलीस ठाण्यातून कार्यमुक्त करण्यात आले होते. त्याला एक वर्षासाठी प्रशिक्षणासाठी पाठविले होते. पवारने हॉटेलमालकाला हुक्का पार्लरवर कारवाई होणार असल्याचा संदेश पाठविला होता. चौकशीत हॉटेलमालकाने पवार याला दरमहा हप्ता देत (प्रोटेक्शन मनी) असल्याचे सांगितले. त्यानंतर पवार याची चौकशी करण्यात आली. त्याचे वर्तन शिस्तीला बाधा पोहोचविणारे असून, पोलीस खात्याचे प्रतिमा मलीन करणारे असल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्यानंतर पवार याला पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले.

# राष्ट्रवादीने भाजपशी लग्न केलेले नाही : छगन भुजबळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



सन २०१४ मध्ये शरद पवार यांनी भाजपला बाहेरून पाठिंबा दिला. त्यानंतरही अनेक वर्ष भाजपाला पाठिंबा देण्यासंदर्भात तळ्यात मळ्यात भूमिका होती. अखेर मी अजित पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. आम्ही सध्या राष्ट्रवादी पक्ष म्हणून राजकीय दृष्ट्या भाजपसोबत आहोत. आम्ही भाजपसोबत लग्न केलेले नाही, अशी भूमिका राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस तर्फे नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात आयोजित आठव्या युवा संसदेमध्ये २ रा संसद कट्टा अंतर्गत विशेष मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांनी छगन भुजबळ यांची मुलाखत घेतली. त्यावेळी त्यांनी आपल्या राजकारणाचा पट विद्यार्थ्यांसमोर उलगडला. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यावेळी उपस्थित होते. छगन भुजबळ म्हणाले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांमुळे मी सर्वसामान्य भाजी विक्रेत्याचा राज्याचा उपमुख्यमंत्री होऊ शकलो. त्यानंतर मंडल आयोगाला पाठिंबा देण्याच्या भूमिकेसंदर्भात त्यांच्याशी वैचारिक मतभेद झाल्यामुळे शिवसेनेतून बाहेर पडलो. मी जर शिवसेनेतून बाहेर पडलो नसतो, तर त्याचवेळी राज्याचा मुख्यमंत्री झालो असतो. तसेच काँग्रेसमध्ये राहून काम केले असते आणि शरद पवार यांच्यासोबत जाऊन राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला नसता, तर त्यावेळी सुद्धा मुख्यमंत्री होण्याची मला संधी होती. परंतु ओबीसींच्या लढ्यासाठी मुख्यमंत्री होण्याच्या दोन संधी सोडून दिल्या. माझ्यासाठी पद महत्त्वाचे नाही तर ओबीसींचे प्रश्न महत्त्वाचे आहेत, त्यासाठी मी आजही पद नसताना लढत राहणार आहे.

ते पुढे म्हणाले, तेलगी प्रकरणाशी काहीही संबंध नसताना शरद पवार यांनी माझा गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा घेतला, परंतु त्यानंतर झालेल्या चौकशीमध्ये माझ्यावर कोणतेही आरोप झालेले नाहीत व ते सिद्धही झाले नाही त्यामुळे एक प्रकारे शरद पवार यांनी माझा राजीनामा घेण्याची घाई केली.

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून असणारा मी ज्येष्ठ नेता आहे, तरीही अजित पवार यांच्यासोबत गेल्यानंतर आज मला आज मंत्रिपद का मिळाले नाही ? याची खंत वाटते. मला मिळणारे पद महत्त्वाचे नाही, परंतु मानसन्मान जर मिळाला नाही तर माणूस दुःखी होतो, अशी खंतही छगन भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले.

# राजेवाडी ते पुरंदर विमानतळापर्यंत रेल्वे मार्गिका

## एकात्मिक वाहतूक आराखड्यात प्रकल्प प्रस्तावित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवाशांना ये-जा करणे सहज शक्य व्हावे, यासाठी सातारा मार्गावरील राजेवाडी रेल्वेस्थानकापासून विमानतळापर्यंत रेल्वेमार्गिका विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. शहर आणि जिल्ह्याच्या एकात्मिक वाहतूक आराखड्यात हा मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या एकूण २ हजार ५५० चौरस किलोमीटर क्षेत्रासाठीचा एकात्मिक वाहतूक आराखडा करण्यात आला आहे. या आराखड्याची तीन टप्प्यांत अंमलबजावणी करण्यात येणार असून, त्यासाठी १ लाख २६ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये मेट्रोमार्गिकांचे विस्तारीकरण, पीएमपी सक्षमीकरणाबरोबर बीआरटी मार्गांचे जाळे, तसेच रेल्वे मार्गांमध्येही सुधारणा करण्याचे नियोजित आहे. पुणे, शिवाजीनगर, चिंचवड आणि तळेगाव स्थानक परिसर वाहतूक सुधारणा योजना त्याअंतर्गत राबविण्यात येणार आहेत. एकात्मिक वाहतूक आराखड्यानुसार तळेगाव आणि दौंड स्थानकांना बाह्यवळण रेल्वे मार्गाने जोडण्याचेही नियोजित आहे. त्यासाठी दोन टप्प्यांत ही कामे केली जातील. तळेगाव ते शिक्रापूर या दरम्यान उरुळी कांचनपर्यंत पूरक सेवा (फीडर सर्व्हिस) देणे नियोजित आहे. तर दुसऱ्या टप्प्यात शिक्रापूर ते दौंड हा रेल्वे मार्ग प्रस्तावित आहे.

सातारा रेल्वे मार्गावर प्रस्तावित विमानतळाजवळ जेजुरी आणि राजेवाडी ही दोन रेल्वे स्थानके आहेत. त्यातील राजेवाडी हे स्थानक विमानतळापासून जवळ आहे. त्यामुळे राजेवाडी ते विमानतळ या दरम्यान रेल्वेचा स्वतंत्र मार्ग (स्पूर लाइन) विकसित करावा लागेल, असे या आराखड्यात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांना जाणे-येणे सुलभ होईल, असा दावाही करण्यात आला आहे.

# पुण्यात 'मनसे'ला मराठी माणसाची पुन्हा आठवण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अस्तित्व जाणवू लागले, की समजायचे कोणत्या तरी निवडणुका जवळ आल्या. निवडणूक आल्यावर आक्रमक होणारा हा पक्ष पुण्यात मागील पाच वर्षांपासून निद्रिस्तावस्थेत असल्यासारखा होता. आता 'हिंदुत्व आणि मराठी माणसासाठी लढा' असा पक्षश्रेष्ठींचा आदेश आल्याने मनसैनिक जागे झाले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा मराठीचे स्मरण करत या पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मराठी माणसासाठी लढ्याला तयार झाल्याचे आश्वासक चित्र पुण्यात सध्या तरी निर्माण झाले आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर नेहमीप्रमाणे मनसे शांत होती. आता अचानक आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यामुळे महापालिका निवडणुका जवळ आल्याची चाहूल लागली आहे. या वेळी 'हिंदुत्व आणि मराठी माणूस' हा विषय घेऊन आक्रमक भूमिका घेण्याचा आदेश पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आल्याने मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्याची सुरुवात 'मनसे आपल्या दारी' या अभियानाने करण्यात आली आहे. पुणे शहरातील नागरी प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या दारी जाऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यास सुरुवात केली आहे. 'प्रश्न जेथे जनतेचा, मार्ग तेथे मनसेचा' हे ब्रीदवाक्य घेऊन या अभियानाद्वारे पुणेकरांशी संपर्क साधण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## अंडाभुर्जी खाल्ल्याचे पैसे मागितल्याने चाकूने वार

**पिंपरी (आरंभ पर्व) : अंडाभुर्जी खाल्ल्याचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या व्यक्तीवर चाकूने वार केले. तसेच, हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना चिखलीतील जाधववाडी येथे घडली. याप्रकरणी सुनील वासुदेव निशानकर (वय ४६, रा. जाधववाडी, चिखली) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील यांची जाधववाडी येथे अंडाभुर्जीची गाडी होती. तिथे आरोपींनी अंडाभुर्जी खाल्ली होती. त्याचे पैसे दिले नव्हते. दरम्यान सुनील यांनी त्यांची गाडी बंद केली. त्यानंतर आरोपींनी त्याच ठिकाणी अंडाभुर्जीची गाडी सुरु केली. सुनील हे आरोपींकडे अंडाभुर्जीचे पैसे मागण्यासाठी गेले. त्याचा राग आल्याने कांदा कापण्याच्या चाकूने सुनील यांच्यावर वार केले. तसेच सुनील यांना लाथाबुक्क्यांनी मारून जखमी केले. सहायक पोलीस निरीक्षक खारगे तपास करीत आहेत.**

## महिलेला धक्का देऊन दागिने चोरणारा अटकेत

**कर्वेनगर (आरंभ पर्व) : कर्वेनगर भागात पादचारी ज्येष्ठ महिलेला धक्का देऊन मंगळसूत्राचा अर्धवट तुटलेला भाग पुन्हा हिसकावणाऱ्या चोरट्याला अलंकार पोलिसांनी अटक केली. दागिने हिसकावणारा चोरटा मध्य प्रदेशातील इराणी टोळीतील असल्याचे उघडकीस आले असून, अलंकार पोलिसांनी त्याला अटक केली. या घटनेची चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारित झाल्यानंतर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली होती. हमीद अफसर खान (वय ३०, सध्या रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर, मूळ रा. होशिंगाबाद, मध्य प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या चोराचे नाव आहे. याबाबत एका ८३ वर्षीय ज्येष्ठ महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तक्रारदार महिला २२ जानेवारी रोजी सकाळी पावणेसातच्या सुमारास फिरायला बाहेर पडल्या. नवसह्याद्री सोसायटीतील रस्त्यावर दुचाकीस्वार चोर हमीद खान याने ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून नेले. ते चोरताना मंगळसूत्राचा अर्धवट भाग तुटला. त्यानंतर खान दुचाकीरून काही अंतर गेला. मंगळसूत्राचा अर्धवट राहिलेला भाग हिसकावण्यासाठी तो पुन्हा तेथे आला. त्याने ज्येष्ठ महिलेला धक्का दिला आणि अर्धवट तुटलेला भाग हिसकावून पळ काढला. या घटनेचे चित्रीकरण परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केले. चित्रफीत समाज माध्यमात प्रसारित झाल्यानंतर नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली होती. पोलिसांनी पसार चोराचा माग काढण्यास सुरुवात केली. जवळपास १०० ते १५० ठिकाणांचे चित्रीकरण पोलिसांनी तपासले. चित्रीकरणात पसार झालेला चोरटा हमीद खान असल्याचे निष्पन्न झाले. खान याच्याविरुद्ध जबरी चोरी, दरोडा असे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.**

# WazirX पुनर्रचनेचा मार्ग खुला झाला

- **सिंगापूर उच्च न्यायालयाने झेटाईला (Zettai) त्याच्या कर्जधारकांसाठी व्यवस्थापन योजनेची सुचना करण्यास परवानगी दिली**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एका महत्त्वाच्या घटनेत, सिंगापूर उच्च न्यायालयाने झेटाई पीटीई लिमिटेडच्या बाजूने निर्णय दिला असून, कंपनीला WazirX क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजच्या वापरकर्त्यांसह एक योजना बैठक बोलवण्याची परवानगी दिली. हा निर्णय झेटाईच्या (Zettai's) WazirX संबंधित संपत्ती वापरकर्त्यांना वितरण करण्याच्या प्रयत्नात आणि प्लॅटफॉर्मच्या ऑपरेशन्सला पुनरुज्जीवित करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे न्यायालयाने झेटाईला (Zettai) १६ आठवड्यांची स्थगिती दिली आहे, जी पुनर्रचन प्रक्रिया पार पाडण्यासाठी आवश्यक वेळ आणि कायदेशीर संरक्षण प्रदान करते. याव्यतिरिक्त, न्यायालयाने झेटाईला (Zettai) योजना बैठकीच्या प्रक्रियेत बदल करण्याची परवानगी देखील दिली आहे, ज्याचा उद्देश प्रक्रिया सुलभ करणे आणि अधिक वापरकर्त्यांना योजना बैठकीत सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे आहे.

न्यायालयाने असे निदर्शनास आणले की प्रक्रियेचा दुरुपयोग झालेला नाही आणि तसेच न्यायालयासमोर कोणत्याही चुकीच्या किंवा गैरवर्तणुकीचे योग्य किंवा पुरेसे पुरावे सादर केले गेले नाहीत, हे काही वापरकर्त्यांच्या या सूचनेस विरोधात होते की झेटाईने (Zettai) सायबर हल्ला घडवून आणला. ही निरीक्षण एक महत्त्वाच्या क्षणी आली आहे, ज्यात अमेरिके, जपान आणि दक्षिण कोरियाच्या सरकारांनी एक संयुक्त निवेदन दिले आहे ज्यामध्ये उत्तर कोरियाच्या लाझारस गटाला सायबर हल्ल्याचे मुख्य जबाबदार म्हणून ओळखले आहे. न्यायालयाने असेही लक्षात घेतले की, जरी झेटाईच्या (Zettai's) अर्जाला विरोध करणारे काही कर्जधारक असू शकतात, तरीही अशा वापरकर्त्यांचा एक मौन बहुमत असू शकतो जे अर्जाला समर्थन देतात पण प्रक्रियेत निष्क्रीय राहण्याचा निर्णय घेतला आहे.

प्लॅटफॉर्मच्या वापरकर्त्यांसाठी संरचित पद्धतीने पुनर्प्राप्ती सुलभ करण्यासाठी वापरकर्त्यांच्या चिंता दूर करण्यासाठी आणि सर्वसमावेशक पुनर्रचना योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यासाठी झेट्टाई (Zettai) या संधीचा लाभ घेऊ इच्छित आहे.

मंजूर योजनेचे मुख्य घटक

1. कर्ज पुनर्रचना चौकट: या योजनेने WazirX संबंधित कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी एक संरचित दृष्टिकोन निश्चित केला आहे, ज्यामुळे सर्व प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांसाठी परताव्याचा अधिकतम फायदा होईल.
2. टोकन वितरण: पुनर्संतुलित प्लॅटफॉर्म लिक्विड संपत्ती १० व्यवसाय दिवसांच्या आत योजना लागू होणाऱ्या तारखेनुसार कर्जधारकांना टोकन्स रूपात वितरित केली जाईल.
3. पुनर्प्राप्ती टोकन अंमलबजावणी: या योजनेत पुनर्प्राप्ती टोकन्स (RTs) जारी करणे आणि पुनर्प्राप्ती टोकन खरेदी यांत्रिकीद्वारे पुनर्प्राप्तीचे वितरण समाविष्ट आहे.
4. प्लॅटफॉर्म पुनरुज्जीवन: योजनांमध्ये WazirX प्लॅटफॉर्मचे रणनीतिक पुनरुज्जीवन समाविष्ट आहे, ज्यामध्ये नवीन क्षमता आणि एक विकेंद्रीकृत एक्सचेंज (DEX) सुरू करणे यांचा समावेश आहे.
5. नफा-वाटप रचना: ३६ महिन्यांच्या कालावधीत प्राप्त झालेल्या निव्वळ नफ्यातून पुनर्प्राप्ती टोकन (RT) खरेदीसाठी निधी वापरण्यात येईल.

"आम्हाला योजना बैठक बोलवण्याची परवानगी दिल्याबद्दल आणि आमच्या प्रयत्नांचे गौरव केल्याबद्दल न्यायालयाचे आभार मानतो. आम्ही वापरकर्त्यांसाठी लवकरात लवकर पुनर्प्राप्ती सुलभ करण्यासाठी कोणतीही कसर ठेवलेली नाही आणि वापरकर्त्यांना योजनेच्या समर्थनार्थ मतदान करण्याची विनंती करतो." असे WazirX संस्थापक निशल शेट्टी यांनी सांगितले.

पुढील टप्पे

कर्जधारकांची बैठक ऑनलाइन आयोजित केली जाणार आहे, ज्यामध्ये प्रस्तावित व्यवस्थापन योजनेसाठी मतदान नंतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होईल. झेटाई (Zettai) लवकरच कर्जधारकांना या प्रक्रियेची माहिती देईल.

या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखण्यासाठी झेट्टाई (Zettai) वचनबद्ध आहे.

झेट्टाईचा (Zettai) असा विश्वास आहे की प्रस्तावित योजना सर्व प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांसाठी ठराव करण्याच्या दिशेने सर्वात कार्यक्षम आणि न्याय्य मार्गाचे प्रतिनिधित्व करते, आणि प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांना योजनेला पाठिंबा देण्यासाठी जोरदार प्रोत्साहन देते, कारण हे पर्यायी परिस्थितीच्या तुलनेत वाढीव पुनर्प्राप्तीची क्षमता प्रदान करते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.